महाराष्ट्र शासन

सेवा व्यवस्थापक, आरोग्य सेवा (परिवहन), नागपुर

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. (०७१२)२२३७९९६ | सेवा व्यवस्थापक, आरोग्य सेवा (परिवहन), माता कचेरी कंपाऊंड,नागपुर - ४४० ०१० यांचे कार्यालय. ई-मेल आयडी : smdwnagpur@yahoo.co.in |
| **आरोग्य सेवा** | |
| **महत्वाचे** | जा.क्र. सेव्यविकाआसेपना/तांत्रिक विभाग/ दरपत्रके-वात्सल्य-फॅब्रीकेशन/ 1744 /२०१८<br>दिनांक : २० नोव्हेंबर , २०१८. |


प्रति,

..............................

..............................

..............................

विषय :- " शासकीय रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी आवश्यक बदल व फॅब्रीकेशन (Fabrication) करणे " साठी दरपत्रके सादर करणे बाबत...

सार्वजनिक आरोग्य विभगांतर्गत राज्यातील जनतेला आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी विविध स्तरावर आरोग्य संस्था कार्यरत आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रसूतींची संख्या जास्त असलेल्या, जिल्हा रुग्णालये / स्त्री रुग्णालये / सामान्य रुग्णालये / उपजिल्हा रुग्णालये (५० व १०० खाटा) अशा आरोग्य संस्थापैकी ०३ संस्थेतील टाटा विंगर शासकीय (१०२) रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणे प्रस्तावित आहे.

टाटा विंगर शासकीय (१०२) रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी आवश्यक बदल व फॅब्रीकेशन (Fabrication) करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामांची यादी खालीलप्रमाणे आहे. सदर काम करण्यासाठी लागणारे साहित्य व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या मजूरीचे एकत्रित, सर्व करसमावेशक दर खालील विर्निदेशाप्रमाणे खालील प्रपत्रात देण्यात यावेत.

**- प्रपत्र -**

| अ. क्र. | रुग्णवाहिके मध्ये करावयाच्या सुधारणा (कामे) | प्रति वाहन दर रुपये सर्व कर आणि खर्चासह |
|---|---|---|
| | **फॅब्रीकेशनची कामे** | |
| १ | मागील सिट्स, स्ट्रेचर आणि स्टेपनी होल्डरचे एमएस स्ट्रक्चर आवश्यकता असेल तर दुरुस्त करणे आणि पेंट करणे. | |
| २ | स्ट्रेचरचे बाजूस मातेस बसण्यास आरामदायी होईल असे बॅक रेस्ट बसविणे. | |
| ३ | मागे बंपरच्या जवळ पायरी बसविणे. | |
| ४ | मागील उजव्या बाजूचे सिट खालील बाजू बंदिस्त करणे. | |
| ५ | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी मागील बाजूस स्टेपनी जवळ ५ लि.पाण्याची बॉटल आणि ग्लास ठेवण्यासाठी स्टॅडची व्यवस्था करुन, त्यावर ५ लि. मिल्टनची बॉटर बॉटल बसविणे. | |
| ६ | मातेस बाळाचे संगोपन आणि लसीकरणाची विविध माहिती देणारी | |

| | | |
|---|---|---|
| | चित्रफीत दाखविण्यासाठी एल.सी.डी. बसविण्यासाठी ड्रायव्हरच्या मागील बाजूस क्रॉसबार आणि माऊंटींग्ज् बसविणे. | |
| ७ | इनव्हर्टरसाठीची अतिरिक्त बॅटरी बसविण्यासाठी कोड्रायव्हर सिटखाली ब्रॅकेट बसविणे. | |
| ८ | माता बाल संगोपना विषयीची माहिती पत्रके दर्शविण्यासाठी ६ ॲक्रलिक बॉक्स रुफ टॉप जवळ बसविणे. | |
| ९ | मागील आतील बाजूस पी.व्ही.सी.मॅटींग बसविणे. | |
| १० | सर्व सिट्स, स्ट्रेचर आणि स्टेपनीसाठी नवीन कापडी कव्हर बसविणे. | |
| ११ | ड्रायव्हरच्या मागील बाजूस, मागील सर्व खिडक्या आणि मागील दरवाज्याला लहान मुलांसाठीचे पडदे बसविणे. | |
| १२ | "वात्सल्य" कार्यक्रमासाठीची विशिष्ठ ध्वनीफित ऐकवण्याची व्यवस्था करणे. त्यामध्ये रुग्णवाहिकेच्या बाहेर वरील बाजूस एक स्पिकर आणि आतील डॅश बोर्डवर ॲम्प्लीफायर बसविणे. (आहुजा मेक) | |
| १३ | मागील कॉर्नर मध्ये मातेस बाळाला घेवून रुग्णवाहिकेमध्ये चढणे सुलभ व्हावे यासाठी हॅडल बसविणे. | |
| १४ | रुग्णवाहिकेच्या मागील भागात बालसुलभ लटकणारी खेळणी लावणे. | |

इच्छूक पुरवठादारांनी वर नमूद कामे करण्यासाठी लागणारे साहित्य व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या मजूरीचे एकत्रित, सर्व करसमावेशक दर संस्थेच्या लेटरहेडवर या कार्यालयास सादर करावयाचे आहेत. सदर दर दिनांक ३० नोव्हेबर, २०१८रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर " शासकीय रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी आवश्यक बदल व फॅब्रीकेशन (Fabrication) करणे " असा स्पष्ट उल्लेख करावा.

**दरपत्रके स्विकारण्याचे व उघडण्याचे वेळापत्रक**

| अक्र. | तपशील | कालावधी | |
|---|---|---|---|
| १ | सिलबंद लिफाफा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | ३०/११/२०१८ | दुपारी ०१.०० वाजेपर्यंत |
| २ | दरपत्रके उघडण्याची वेळ व तारीख | ३ /१२/२०१८ | दुपारी ०३.०० वाजता. |
| ३ | दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) नागपुर<br>पत्ता - माता कचेरी कंपाऊंड, श्रदधानंदपेठ, नागपुर - ४४००१० | |

प्राप्त संस्थांची दरपत्रके दिनांक ३ डिसेबर, २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता शक्यतो आपल्या/ आपलेकडील अधिकृत प्रतिनिधींचे समक्ष वर नमूद केलेल्या कार्यालयामध्ये उघडण्यात येतील.

...३/-

# दरपत्रक सादर करताना घ्यावयाच्या सूचना.

१) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "निविदाकारांची हमी" चे विहीत प्रपत्र-अ सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) दरपत्रक सादर करण्याऱ्या संस्थेच्या लेटरहेडवर VAT/CST/LBT/GST/SGST क्रमांक नमूद करण्यात यावा.

३) अटी व शर्तींसह असलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

४) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

५) विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.

६) दरपत्रकांमध्ये नमूद दर / किंमत सर्व करासहीत असावे.

७) अनुदानाच्या उपलब्धतेनुसार साहित्याच्या नग संख्येत बदल होतील.

८) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) नागपुर यांना राहतील. कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रके नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) नागपुर यांना राहतील.

20/11/18

**(पी.आर.दिक्षीत)**
सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा (परिवहन),नागपुर.

प्रत - नोटीस बोर्ड.

प्रपत्र - अ

<u>निविदाकारांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमूना</u>

मी/ आम्ही/ आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/ आम्ही/ आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

दिनांक :-

निविदाधारकाची सही व संस्थेचा शिक्का

महाराष्ट्र शासन

# सेवा व्यवस्थापक , आरोग्य सेवा (परिवहन), नागपुर

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. (०७१२)२२३७९९६ | सेवा व्यवस्थापक, आरोग्य सेवा (परिवहन), माता कचेरी कंपाऊंड, नागपुर - ४४० ०१० यांचे कार्यालय. ई-मेल आयडी : smdwnagpur@yahoo.co.in |
| आरोग्य सेवा | |
| **महत्वाचे** | जा.क्र. सेव्यविकाआसेपना /तांत्रिक विभाग/ दरपत्रके-वात्सल्य-स्टिकरींग /1745/२०१८<br>दिनांक : २० नोव्हेबर, २०१८. |

प्रति,

................................

................................

................................

विषय :- “ शासकीय रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी आवश्यक स्टिकरींग (Stickering) करणे ” साठी दरपत्रके सादर करणे बाबत...

सार्वजनिक आरोग्य विभगांतर्गत राज्यातील जनतेला आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी विविध स्तरावर आरोग्य संस्था कार्यरत आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रसूतींची संख्या जास्त असलेल्या, जिल्हा रुग्णालये / स्त्री रुग्णालये / सामान्य रुग्णालये / उपजिल्हा रुग्णालये (५० व १०० खाटा) अशा आरोग्य संस्थापैकी ०३ संस्थेतील टाटा विंगर शासकीय (१०२) रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी प्रस्तावित आहे.

सदरचे काम करण्यासाठी लागणारे साहित्य व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या मजूरीचे एकत्रित, सर्व करसमावेशक दर खालील विर्निदेशाप्रमाणे खालील प्रपत्रात देण्यात येत आहे.

- प्रपत्र -

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | विर्निदेश (तपशिल) | प्रति वाहन दर रुपये सर्व कर आणि खर्चासह |
|---|---|---|---|
| १ | **Stickering on TATA Winger Ambulance for Coversion to Vatsalya Vehicle** | | |
| | Branding of Vatsalya Vehicle using Nicolet reflective vinyl self adhesive material as per shown in attached file. | | |

इच्छूक पुरवठादारांनी वर नमूद कामे करण्यासाठी लागणारे साहित्य व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या मजूरीचे एकत्रित, सर्व करसमावेशक दर संस्थेच्या लेटरहेडवर या कार्यालयास सादर करावयाचे आहेत. सदर दर दिनांक ३० नोव्हेबर, २०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर “ शासकीय रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी आवश्यक स्टिकरींग (Stickering) करणेसाठी दरपत्रके ” असा स्पष्ट उल्लेख करावा.

...२/-

महाराष्ट्र शासन

# सेवा व्यवस्थापक, आरोग्य सेवा (परिवहन), नागपुर

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. (०७१२)२२३७९९६ | सेवा व्यवस्थापक, आरोग्य सेवा (परिवहन), माता कचेरी कंपाऊंड,नागपुर - ४४० ०१० यांचे कार्यालय. ई-मेल आयडी : smdwnagpur@yahoo.co.in |
| आरोग्य सेवा | |
| **महत्वाचे** | जा.क्र. सेव्यविकाआसेपना/तांत्रिक विभाग/ दरपत्रके-वात्सल्य- स्टिकरींग/1747/२०१८ दिनांक : 20 नोव्हेबर, २०१८. |

प्रति,

मा. सहसंचालक, आरोग्य सेवा

(खरेदी कक्ष) १ ला मजला ,

आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

विषय :- शासकीय रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी आवश्यक स्टिकरींग (Stickering) करणे" साठी दरपत्रके सादर करणे बाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४/, दि : ०१.१२.२०१६

२) या कार्यालयाचे दरपत्रकाचे आमंत्रण पत्र जा.क्र. १७४५ , दिनांक : २0 नोव्हेबर, २०१८.

महोदय,

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/प्र.क्र. ८२/भाग-III/उद्योग-४/,दिनांक ०१ डिसेंबर २०१६, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तीका मधील परिच्छेद क्र. ४.२ मधील निर्देशानुसार दरपत्रकावर खरेदी करावयाच्या खरेदीची नोटीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी तसेच संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून देकार सादर करण्यास एक आठवडयाचा कालावधी देण्यात यावा असे निर्देशित केलेले आहे.

या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येत आहे की, या कार्यालयाकडून शासकीय रुग्णवाहिकांचे वात्सल्य वाहनात रुपांतरण करणेसाठी आवश्यक स्टिकरींग (Stickering) करणेसाठी मागविण्यात येणाऱ्या दरपत्रकाची नोटीस (जाहिर सूचना) चा नमूना सोबत जोडून सादर करण्यात येत आहे. सदर नोटीस दिनांक २२ नोव्हेबर, २०१८ च्या पूर्वी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. ही सविनय विंनती.

सोबत :- दरपत्रक नोटीस (जाहिर सूचना) नमूना

20/11/18

(पी.आर.दिक्षीत)

सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,

आरोग्य सेवा (परिवहन),नागपुर

## दरपत्रके स्विकारण्याचे व उघडण्याचे वेळापत्रक

| अक्र. | तपशील | कालावधी | |
|---|---|---|---|
| १ | सिलबंद लिफाफा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | ३० /११/२०१८ | दुपारी ०१.०० वाजेपर्यंत |
| २ | दरपत्रके उघडण्याची वेळ व तारीख | ०३ /१२/२०१८ | दुपारी ०३.०० वाजता. |
| ३ | दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) नागपुर<br>पत्ता- माता कचेरी कंपाऊंड, श्रदधानंदपेठ, नागपुर - ४४००१० | |

प्राप्त संस्थांची दरपत्रके दिनांक ०३ डिसेंबर, २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता शक्यतो आपल्या/ आपलेकडील अधिकृत प्रतिनिधींचे समक्ष वर नमूद केलेल्या कार्यालयामध्ये उघडण्यात येतील.

### दरपत्रक सादर करताना घ्यावयाच्या सूचना.

१) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "निविदाकारांची हमी" चे विहीत प्रपत्र-अ सोबत जोडणे आवश्यक आहे.
२) दरपत्रक सादर करण्याऱ्या संस्थेच्या लेटरहेडवर VAT/CST/LBT/GST/SGST क्रमांक नमूद करण्यात यावा.
३) अटी व शर्तीसह असलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
४) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
५) विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.
६) दरपत्रकांमध्ये नमूद दर / किंमत सर्व करासहीत असावे.
७) अनुदानाच्या उपलब्धतेनुसार साहित्याच्या नग संख्येत बदल होतील.
८) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) पुणे यांना राहतील. कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रक नाकारण्याचा पुर्ण अधिकार उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन) पुणे यांना राहतील.

(पी.आर.दिक्षीत)
सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा (परिवहन),नागपुर

प्रत - नोटीस बोर्ड.

प्रपत्र - अ

## निविदाकारांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमूना

मी/ आम्ही/ आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/ आम्ही/ आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

दिनांक :-

निविदाधारकाची सही व संस्थेचा शिक्का